पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८
प्राथमिक शिक्षण विभाग
दुरध्वनी क्र. ०२०-६७३३३३३३
ई-मेल schoolboard@pcmcindia.gov.in

जा.क्र. शिक्षण/प्राशि/६/कावि/ २९९/२०२२

दिनांक- ०३/०४/२०२३

विषय:- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील तसेच प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागाच्या कार्यक्रमांकरिता महानगरपालिकेचे सर्व नाट्यगृह मोफतउपलब्ध करून देणे बाबत...

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडून ११० व माध्यमिक शिक्षण विभागाकडून १८ शाळा चालविल्या जातात. सदर शाळांमार्फत स्नेहसंमेलने तसेच विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. तसेच शिक्षण विभाग मुख्य कार्यालयाकडून शिक्षक दिन पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. सदर कार्यक्रमासाठी नाट्यगृह / प्रेक्षागृहाची आवश्यकता असल्याने मनपाचे सर्व नाट्यगृह / प्रेक्षागृह मोफत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

सबब,मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा तसेच प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागाच्या मुख्य कार्यालयामार्फत आयोजित कार्यक्रमाकरिता मनपाची सर्व नाट्यगृहे मोफत उपलब्ध करून देणेस या आदेशान्वये मान्यता देत आहे. प्रस्तुत आदेशाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष सन २०२२-२३ या साला पासुन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.

प्रती,
व्यवस्थापक,
१) प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड
२) अंकुशराव लांडगे नाट्यगृह, भोसरी
३) निळू फुले नाट्यगृह, सांगवी
४) आचार्य अत्रे नाट्यगृह, संत तुकारामनगर, पिंपरी

प्रत,
१) मा.अति.आयुक्त (१), पिंपरी चिंचवड महानगरपालिका
२) मा.अति.आयुक्त (३) PCMC
३) सर्व क्षेत्रीय कार्यलय पिं. ची. मनपा

Scanned with CamScanner